N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0268 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/04/2024 01:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 01/04/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2024
**Time From (वेळेपासून):** 15:48 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/04/2024 **Time (वेळ):** 00:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/04/2024 00:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील,प्रसाधन गृहा समोर बुलढाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुदाम वसुदेव बोन्हाडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कळमेश्वर, ता मेहकर, , मेहकर,जानेफल,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कळमेश्वर, ता मेहकर, , मेहकर,जानेफल,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329433254

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अजित किसनराव करडेल | | | 1. सरस्वती नगर बुलढाणा, बुलढाणा,बुलढाणा शहर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फि ने फिर्याद दिले वरुन

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु चलनाच्या 2 नोटा एकुण 1000/ रु | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप नंबर -268/2024 कलम 7 भ.प्रति. अधि 1988
फिर्यादी - सुदाम वसुदेव बोन्हाडे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती, रा. कळमेश्वर, ता. मेहकर, जि. बुलढाणा मो.नं. 8329433254
आरोपी -श्री. अजित किसनराव करडेल, वय 43 वर्ष, पद सहायक कार्यक्रम अधिकारी, (कंत्राटी) रोजगार हमी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा, रा. सरस्वती नगर बुलढाणा
घटनास्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रसाधन गृहा समोर बुलढाणा
घ ता वेळ -दि 01/04/2024 चे 15/48 वा ते 16/22 वा पावेतो
दा ता वेळ - दिनांक 02/04/2024 चे वा
मिळाला माल –नगदी रोख 1,000/- रुपये
दाखल अधि -पोहे का◌ॅ रविंद्र हजारे ब न 122 पो स्टे बुलडाणा शहर मो नं -8668566700
तपास अधि -पो नि श्री महेश भोसले अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा मो क्र 9028200444
फिर्याद अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा
दिनांक 02-04-2024सुदाम वसुदेव बोन्हाडे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती, रा. कळमेश्वर, ता. मेहकर, जि. बुलढाणा मो.नं. 8329433254 मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. माझेकडे ग्राम थार शिवारात गट क 110 मध्ये 1 हेक्टर 64 आर शेती असून सदर शेती पैकी एक एक्कर शेतीवर मी मागील दोन वर्षापासून रेशीम उदयोगासाठी लागणारे तुती वनस्पतीची लागवडीचे पिक घेतो. सदर तुती पिकाकरिता महाराष्ट्र शासनाचे रोजगार हमी विभागामार्फत कुशल निधी म्हणून प्रत्येक महिन्याला ठराविक अनुदान मिळत असते. त्यानुसार मी गेल्या दोन वर्षापासून एक एकर शेतीवर रेशीम उदयोगासाठी लागणारे तुती वनस्पतीची लागवड करित आहे. तसेच सदर रेशीम किड्यासाठी मी शेतात 22× 50 शेड बांधलेले आहे. रेशीम शेतीसाठी प्रत्येक महिन्यावारी शासनाकडून कुशल अनुदान मिळणे गरजेचे होते परंतु आमचे वरील पिकांचे गेल्या एक वर्षापासूनचे कुशल खर्चाचा निधी मला मिळालेला नसल्याने मी तसेच कंबरखेड येथिल शेतकरी श्री. विजय मुळे असे आम्ही दोघे तहसिल कार्यालय मेहकर येथील संबधीत क्लर्क श्री. सानप मॅडम यांना भेटलो असता त्यांनी माझे, विजय अर्जुन मुळे, वसुदेव शंकर बोन्हाडे, मिरा मधुकर निकम, विठठल सुखदेव बोन्हाडे, असे आम्हा पाच शेतकऱ्यांचे तुती पिकाचे कुशल निधीचे बिलांची फाईल तयार केली असल्याचे सांगून सदर फाईल ही आमचेकडे देवून जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी विभागात कार्यरत असलेले संबधीत श्री. करडेल बाबु यांचेकडे देण्यास सांगितली असता, मी दिनांक 27.03.2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी विभागातील संबधीत करडेल साहेब यांचेकडे संबधीत कुशल निधीची फाईल देवून कुशल निधीचे बिलाबाबत बोलणी केली असता करडेल साहेब यांनी मला सदर बिलाचे फाईलची नोटशिट तयार करुन त्यावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. यांची सही घेवून ती फाईल मा. आयुक्त रो.ह.यो नागपूर यांचे कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्याकरिता एकूण पाच लाभार्थ्यांचे प्रत्येकी 500/- रुपये प्रमाणे 2500/- रुपयांची लाचेची मागणी करित असल्याबाबत मी तसेच माझे सोबत असलेले तुती पिकाचे कुशल निधीचे लाभार्थी श्री विजय अर्जुन मुळे यांचेसह जावून लाच मागणी बाबत अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा घटकाकडे लेखी तकार दिली.त्यावरुन दिनांक 27.03.2024 रोजी आगार व्यवस्थापक राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यावेळी पोलीस निरीक्षक, महेश भोसले यांनी मला त्यांचा तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांचा व पंचाचा परीचय करुन दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक, महेश भोसले यांनी मला व पंचाना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार यातील लोकसेवक श्री. करडेल यांची लाचमागणी कारवाई करणे असल्याने त्यांची जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी

विभागाचे कार्यालयात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्यावेळी पोलीस निरीक्षक, महेश भोसले यांनी व्हॉईस रेकार्डर चालू करुन माझे शर्टाचे आतून ते बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क. 1 श्री. बंडू मनवर व माझे सोबत लाभार्थी शेतकरी श्री विजय मुळे असे आम्ही तिघे दोन वेगवेगळ्या मोटार सायकलने 17.24 वा. जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी विभागाचे कार्यालयाकडे रवाना झालो. त्यावेळी मी व पंच क 1. श्री मनवर व लाभार्थी शेतकरी श्री. विजय मुळे असे आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी विभागाचे कार्यालयात जावून श्री. करडेल बाबू यांची भेट घेतली. त्यावेळी मी व विजय मुळे यांनी त्यांचेशी तुती पिकाचे कुशल निधीचे बिला संबधाने चर्चा केली असता मी लोकसेवक श्री. करडेल यांना म्हणालो की, नाही विषय असा झाला आम्ही दोघ हजर आहेत, तुमच्याशी जे निकम अनं बोन्हाडे आहे का नाही त्याचा काही कॉन्टॅक्ट झाला नाही, हे यांना सांगा एकदा ते त्यांनी शंका काढली पुन्हा, त्यावेळी लाभार्थी शेतकरी मुळे म्हणाले की, किती किती दयायचे काही सांगीतल नाही, त्यावेळी मी लोकसेवक करडेल यांना म्हणालो की, त्यायल्ह एकदा सांगा बाबा काय हे, त्यावेळी लाभार्थी शेतकरी मुळे म्हणाले की, किती किती दयायचे, त्यावेळी लोकसेवक करडेल म्हणाले की, पाच पाचशे म्हणल त्यायले, त्यावेळी लाभार्थी शेतकरी मुळे म्हणाले की, पाच पाचशे न म्हणल होत का?, त्यावेळी लोकसेवक श्री करडेल यांनी हं म्हणून होकार देवून आमचे दोघांचे कुशल निधीचे बिलाची फाईलची नोटशिट तयार करुन त्यावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. बुलढाणा यांची सही घेवून सदर फाईल आयुक्त, रो.ह.यो. नागपुर यांचे कार्यालयाकडे सादर करण्यासाठी प्रत्येकी पाचशे रुपये प्रमाणे दोघाचे 1000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यावरुन आम्ही लाप्रवि. कार्यालयात परत आलो. त्यावेळी भोसले साहेब यांनी माझेत व लोकसेवक श्री. करडेल यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून करडेल यांनी माझेकडे तसेच विजय मुळे यांचे प्रत्येकी 500/- रुपये प्रमाणे असे दोघांचे एकूण 1000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली असल्याबाबत खात्री केली. दिनांक 27.03.2024 रोजी माझेकडे तसेच लाभार्थी शेतकरी श्री. विजय मुळे यांचेकडे लोकसेवक करडेल यांनी केलेल्या लाचमागणी प्रमाणे त्यांना देण्यासाठी 1000/- रुपये उपलब्ध नसल्याने व दिनांक 28.03.2024 रोजी मला महत्वाचे कामानिमीत्त बाहेरगावी जाणे असल्याने तसेच दिनांक 29.03.2024 ते 31.03.2024 रोजी शासकिय सुटटी असल्याने सदर प्रकरणात 01.04.2024 रोजी पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याबाबत मी विनंती केल्याने सदर प्रकरणात दिनांक 01.04.2024 रोजी पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.त्यानुसार आज दिनांक 01.04.2024 रोजी मी लाप्रवि. कार्यालय बुलढाणा येथे हजर आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक भोसले साहेब यांनी लोकसेवक श्री करडेल, रोजगार हमी विभाग बुलढाणा यांचे दिनांक 27.03.2024 रोजीचे लाचमागणी प्रमाणे श्री करडेल यांना लाच रक्कम देण्यासाठी माझे व श्री. मुळे यांचे प्रत्येकी 500/- रू. प्रमाणे 1000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील 1000/- रुपये दरांच्या दोन भारतीय चलनातील नोटा असे एकूण 1000/- रुपये भोसले साहेब, यांचेकडे हजर केले. त्यावेळी भोसले साहेब यांनी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने सदर नोटांचे कमांक लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण करुन सदर लाच रक्कम माझे शर्टाचे डाव्या बाजुच्याखिश्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा पुर्व पंचनाम्याप्रमाणे सविस्तर सुचना दिल्या. त्याबाबतचा सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानुसार सदर प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी विभागाचे कार्यालयामध्ये सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार भोसले साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात लटकावून दिले. त्यानंतर मला व पंच क 1 श्री. मनवर यांना खाजगी मोटार सायकलने जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील रोजगार हमी विभागाचे कार्यालयामध्ये 15.48 वा. रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग खाजगी मोटार सायकलनी भोसले साहेब तसेच सापळा पथक व पंच क. 2 श्रीमती जाधव असे रोजगार हमी विभागाचे कार्यालयाकडे रवाना झाले. त्यानंतर मी व पंच क 1असे रोजगार हमी विभागाचे कार्यालयात जावून लोकसेवक श्री. करडेल यांची भेट घेतली असता झालेल्या भेटीदरम्यान आमचे तुती पिकाचे कुशल निधीसंबधाने चर्चा झाली झालेल्या चर्चेदरम्यान लोकसेवक करडेल यांनी मला कार्यालयाचे बाहेर घेवून जावून बाजुला असलेल्या प्रसाधन गृहा समोर घेवून जावून हाताचे बोटे हलवून लाच रक्कम देण्याबाबत इशारा केला असता मी माझे उजव्या हाताने शर्टाचे डाव्या बाजुचे खिश्यातील लाचेची रक्कम काढून लोकसेवक श्री करडेल यांचेसमोर धरुन एक हजार रुपये असे म्हणालो असता, लोकसेवक करडेल यांनी सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन बर असे म्हणून सदर लाच रक्कम स्वतःचे नेसत्या शर्टाचे खिश्यामध्ये ठेवून दिली. त्यावेळी मी माझे गळयातील टॉवेल काढून हातात धरुन लाच स्विकारले बाबत नियोजित इशारा केला असता पो.नि. भोसले साहेब व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. करडेल बाबू यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गाव विचारले

असता त्यांनी त्यांचे नाव श्री. अजित किसनराव करडेल, वय 43 वर्ष, पद सहायक कार्यक्रम अधिकारी, (कंत्राटी) रोजगार हमी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा, रा. सरस्वती नगर बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
तरी आलोसे. श्री. अजित करडेल, पद सहायक कार्यक्रम अधिकारी (कंत्राटी) रो.ह.यो. जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांनी माझेकडे तसेच माझे सोबतचे लाभार्थी शेतकरी श्री. विजय मुळे यांचेककडे दिनांक 27.03.2024 रोजीचे पडताळणी कार्यवाही दरम्यान आमचे तुती पिकाचे कुशल निधीच्या बिलाचे फाईलची नोटशिट तयार करुन त्यावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. यांची सही घेवून सदर बिल हे आयुक्त कार्यालय, रोजगार हमी विभाग नागपूर यांचे कार्यालयास मंजुरीसाठी सादर करण्याकरिता प्रत्येकी 500/- रुपये प्रमाणे दोघांचे एकूण 1000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1000/- रुपये आज दिनांक 01.04.2024 रोजी 15.48 ते 16.22 वा दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या प्रसाधन गृहाचे समोर स्विकारले वरुन आलोसे. श्री. अजित किसनराव करडेल, वय 43 वर्ष, पद सहायक कार्यक्रम अधिकारी, (कंत्राटी) रोजगार हमी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा, रा. सरस्वती नगर बुलढाणा यांचे विरुध्द मी कायदेशिर फिर्याद देत आहे. अशा फि चे लेखी फिर्याद वरुन अप सदरचा दाखल करुन तपास पो नि मोसले सा यांचेकडे देण्यात आला.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NARENDRA GAJANAN THAKARE(I (Inspector)) / 01000402NCTM8001W **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** NARENDRA GAJANAI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 01000402NGTM8001W